CMYK

दैनिक

# आरंभ मराठी

www.arambhmarathi.com

**सुविचार**

बलहीन व्यक्ती कुणालाही क्षमा करू शकत नाही. बलवान माणूसच क्षमा करू शकतो.




■ कोल्हापूर ■ सांगली ■ सातारा ■ सोलापूर ■ धाराशिव ■ लातूर ■ वर्ष 3 रे ■ अंक 35 ■ रविवार, 26 एप्रिल 2026 ■ पाने 04 ■ किंमत रू.4 ■ epaper.arambhmarathi.com

# तब्बल ३० तासानंतर सापडला तेरणा नदीत बुडालेल्या तरुणाचा मृतदेह

## प्रशासनाच्या शर्थीच्या प्रयत्नांना यश

**आरंभ मराठी । तेर**

धाराशिव तालुक्यातील तेर येथे तेरणा नदीच्या पात्रात बुडालेल्या तरुणाचा अखेर तब्बल ३० तासांनंतर शोध लागला असून प्रशासनाच्या शर्थीच्या प्रयत्नांना यश आले आहे. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. शुक्रवार (दि.२४) रोजी अमरनाथ लक्ष्मण देवकुळे हा तरुण तेरणा नदीत पोहण्यासाठी गेला असता पाण्यात बुडाला. घटनेनंतर गावकऱ्यांनी तत्काळ शोधकार्य सुरू केले; मात्र त्यांना यश आले नाही. दुपारी राज्य आपत्ती व्यवस्थापन दलाचे धाराशिव येथील जवान बोटीसह घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी गावकऱ्यांच्या मदतीने शोधमोहीम हाती घेतली, परंतु अंधार पडल्याने सायंकाळी सुमारे ६ वाजता शोधकार्य थांबविण्यात आले. शनिवारी सकाळी पुन्हा शोधमोहीम सुरू करण्यात आली. तहसीलदार डॉ. मृणाल जाधव यांनी घटनास्थळी भेट देऊन जलाशयातील पाणी सोडण्याच्या सूचना दिल्या. त्यानुसार पाणी सोडण्यात आले,



तरीही तरुणाचा शोध लागत नव्हता. त्यामुळे पुणे जिल्ह्यातील इंदापूर येथून स्कुबा डायव्हिंग करणाऱ्या





खाजगी पथकाला पाचारण करण्यात आले. निखिल शिवतारे व बनारसी चव्हाण (बारामती) यांच्या पथकाने शोधमोहीम हाती घेतल्यानंतर अवघ्या काही तासांत अमरनाथ देवकुळे यांचा मृतदेह शनिवारी सायंकाळी साडेपाच वाजण्याच्या सुमारास सापडला. त्यामुळे प्रशासनाने सुटकेचा निश्वास सोडला. दरम्यान, घटनास्थळी आमदार राणाजगजितसिंह पाटील, तहसीलदार डॉ. मृणाल जाधव तसेच पोलिस निरीक्षक विलास हजारे यांनी भेट देऊन परिस्थितीचा आढावा घेतला व मृताच्या नातेवाईकांना धीर दिला. घटनास्थळी मृत अमरनाथ देवकुळे यांचे आई-वडील, पत्नी, मुले व नातेवाईक आक्रोश करत असल्याने परिसरात अत्यंत हृदयद्रावक व दुःखद वातावरण निर्माण झाले होते.

# चिंताजनकः तीन दिवसाला एक शेतकरी आत्महत्या

## पंधरा महिन्यात पावणे दोनशे शेतकऱ्यांनी कर्जबाजारी होऊन आयुष्य संपवले

## अतिवृष्टीनंतर आत्महत्येच्या संख्येत लक्षणीय वाढ

**सज्जन यादव । आरंभ मराठी**

धाराशिव - धाराशिव जिल्ह्यात शेतकरी आत्महत्येची संख्या दिवसेंदिवस वाढतच असून, यामुळे सामाजिक जीवनावर गंभीर परिणाम होत असल्याचे दिसून येत आहे. मागील काही वर्षांपासून मराठवाड्यात धाराशिव जिल्ह्यात सर्वाधिक शेतकरी आत्महत्या होत असल्याचे आकडेवारीवरून दिसत आहे. मागील पंधरा महिन्यांत जिल्ह्यात शेतकरी आत्महत्येच्या तब्बल 171 घटना घडल्या असून, दर तीन दिवसाला एक आत्महत्या होत आहे. विशेष म्हणजे अतिवृष्टीनंतर जिल्ह्यातील शेतकरी आत्महत्यांची संख्या लक्षणीय प्रमाणात वाढली आहे.

गेल्या पंधरा महिन्यांत जिल्ह्यातील 171 शेतकऱ्यांनी आपली जीवनयात्रा संपवली आहे. आत्महत्येसाठी कर्जबाजारीपणा, नापिकी तसेच उत्पादन खर्चदेखील शेतमालाच्या विक्रीतून पुरेसा मिळत नसल्याचे कारण दिले जात आहे. आत्महत्या रोखण्यासाठी शासनाकडून विविध योजना आणि सवलती पुरविल्या जात असल्या तरी जिल्ह्यात तीन दिवसांत सरासरी एका शेतकऱ्याने गळफास जवळ केल्याचे वास्तव समोर आले आहे. गेल्या काही वर्षांपासून शेतमालाला भाव मिळत नसल्याने पिकांच्या मशागतीसाठी खर्च झालेला पैसादेखील शेतकऱ्यांच्या हाती लागत नाही. त्यामुळे बँकेचे तसेच सावकारी कर्ज कसे फेडायचे असा प्रश्न शेतकऱ्यांपुढे निर्माण होत असल्याने जगणेच नको अशी मानसिकता वाढीस लागली आहे. बँका आणि खासगी सावकारीच्या तगादीला वैतागलेला शेतकरी शेवटी गळफास जवळ करु लागला आहे. त्यामुळे जिल्ह्यात हे प्रमाण दिवसेंदिवस वाढू लागले आहे. 2024 मध्ये दीडशेहून अधिक शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या होत्या. 2025 मध्ये देखील जवळपास तेवढ्याच शेतकऱ्यांनी आपले जीवन संपवल्याची नोंद जिल्हाधिकारी कार्यालयातील टंचाई विभागात झालेली आहे. जिल्ह्यात दर महिन्याला सरासरी 11 ते 12 शेतकरी जीवन संपवत आहेत. मागील पाच वर्षांपासून ही संख्या तेवढीच आहे.



### अतिवृष्टीनंतर आत्महत्या वाढल्या

धाराशिव जिल्ह्यात मागील वर्षी ऑगस्ट आणि सप्टेंबर अतिवृष्टीमुळे शेतीपिकांचे अतोनात नुकसान झाले होते. त्यानंतर जिल्ह्यातील शेतकरी मानसिकदृष्ट्या निराश झाले. त्यातूनच आत्महत्येची संख्या वाढत गेल्याचे दिसते. मागील वर्षी सप्टेंबर महिन्यात 18, ऑक्टोबर महिन्यात 12 आणि नोव्हेंबर महिन्यात 13 अशा तीन महिन्यातच तब्बल 43 शेतकऱ्यांनी जीवन संपवले. अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीमुळे शेतकरी हताश झाले आणि टोकाचे पाऊस उचलू लागले.

### शासकीय मदत न मिळाल्याने निराशा आणखी वाढली

अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीत शासनाने मदतीचा हात न दिल्याने शेतकऱ्यांची निराशा वाढली. अतिवृष्टीमुळे 33 हजार शेतकऱ्यांची 8800 हेक्टर जमीन खरडून गेली अशा शेतकऱ्यांना तुटपुंजी रक्कम मिळाली. 9000 विहिरी पावसाने बुजल्या गेल्या अशा शेतकऱ्यांना देखील सात महिने होऊनही मदत मिळाली नाही. महाडिबिटी अनुदान, पीकविमा यांचीही मदत न मिळाल्याने शेतकरी हताश झाले आहेत.

सरकारकडून शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी विविध योजना आणि सवलती दिल्या जातात. परंतु, योजनांच्या अंमलबजावणीमधेच त्रुटी असल्याने त्याचा चांगला परिणाम दिसून येत नाही. परिणामी शेतकऱ्यांच्या आत्महत्येवर अजूनही अंकुश लावता आलेला नाही. काही स्वयंसेवी संस्थांकडून देखील काही प्रमाणात मदत आणि मार्गदर्शन केले जात आहे. असे असले तरी शेतकरी आत्महत्या रोखण्यास यश येताना दिसत नाही.

### शेतकरी आत्महत्येची पंधरा महिन्यातील आकडेवारी

| | |
|---|---|
| जानेवारी | 10 |
| फेब्रुवारी | 10 |
| मार्च | 11 |
| एप्रिल | 14 |
| मे | 11 |
| जून | 7 |
| जुलै | 18 |
| ऑगस्ट | 4 |
| सप्टेंबर | 18 |
| ऑक्टोबर | 12 |
| नोव्हेंबर | 13 |
| डिसेंबर | 13 |
| जानेवारी | 5 |
| फेब्रुवारी | 9 |
| मार्च | 16 |
| एकूण | 171 |

### 2026 मध्ये तीन महिन्यात 30 आत्महत्या

2026 या वर्षात देखील शेतकरी आत्महत्यांची संख्या वाढतच चालली आहे. जानेवारी महिन्यात केवळ 5 आत्महत्यांची नोंद झाली. मात्र त्यानंतर फेब्रुवारी महिन्यात 9 आणि मार्च महिन्यात 16 आत्महत्या नोंदवल्या गेल्या. यावर्षीचा मान्सूनवर अल निनो चा प्रभाव असल्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. त्यामुळे यावर्षीदेखील निसर्गाने अवकृपा केली तर पुन्हा एकदा आत्महत्या वाढण्याची भीती आहे. राज्य सरकारने जून महिन्यात शेतकरी कर्जमाफी करण्याची घोषणा केली आहे. त्याचा कितपत फायदा शेतकऱ्यांना होतो त्यावरच शेतकरी आत्महत्यांची संख्या वाढणार की कमी होणार हे दिसणार आहे.

# बांगलादेशी महिलांकडून वेश्या व्यवसाय, तामलवाडीतील 'मिलन लॉज'वर छापा

## दोन आरोपींना अटक; तीन महिलांची सुटका



**आरंभ मराठी । धाराशिव**

अनैतिक मानवी वाहतूक शाखेच्या पथकाने तुळजापूर तालुक्यातील तामलवाडी येथे मोठी कारवाई करत 'मिलन लॉज'वर छापा टाकून वेश्या व्यवसायाचा पर्दाफाश केला. या कारवाईत दोन आरोपींना ताब्यात घेण्यात आले असून तीन महिलांची सुटका करण्यात आली आहे. धक्कादायक बाब म्हणजे सुटका करण्यात आलेल्या महिलांपैकी दोन महिला बांगलादेशी असल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे. यासंबधी सविस्तर वृत्त असे की, पोलिसांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली होती की, तामलवाडी येथील मिलन लॉजमध्ये काही महिलांकडून वेश्या व्यवसाय करून घेतला जात आहे. या माहितीनुसार पथकाने नियोजनबद्ध छापा टाकला. छाप्यामध्ये तीन महिला आढळून आल्या. त्यांची ओळख गोपनीय ठेवण्यात आली असून त्यापैकी दोन महिलांकडे असलेल्या कागदपत्रांवरून त्या बांगलादेशातील असल्याचे स्पष्ट झाले. या महिलांना कोण घेऊन आले, त्या भारतात कशा व केव्हा आल्या आणि किती दिवसांपासून हा व्यवसाय करत होत्या याबाबत पोलीस सखोल तपास करत आहेत. याशिवाय जिल्ह्यात इतर ठिकाणीही अशा प्रकारे परदेशी महिलांचा वापर करून देह व्यापार चालवला जात आहे का, याचाही शोध घेतला जात आहे. या प्रकरणात दिलीप सिद्धाप्पा मंगरुळे (वय 43, सोलापूर) आणि संतोष नामदेव पवार (वय 40, रा. तिऱ्हे, ता. उत्तर सोलापूर) या दोघांना अटक करण्यात आली आहे. हे दोघेही संबंधित महिलांना व्यावसायिक कारणासाठी आश्रय देऊन त्यांच्याकडून वेश्या व्यवसाय करवून घेत होते व त्यावर उपजीविका करत असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. कारवाईदरम्यान पोलिसांनी आरोपींकडून दोन मोबाईल फोन, पिग्मी पासबुक, नोंदवही, यूपीआय स्कॅनर मशीन, लॉजचा परवाना फॉर्म, रोख रक्कम ५,७०० रुपये तसेच निरोधची पाकिटे असा एकूण सुमारे २५,७०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. तामलवाडी पोलीस ठाण्यात आरोपींविरुद्ध गुन्हा क्रमांक 60/2026 नोंदवण्यात आला असून भारतीय न्याय संहिता (BNS) कलम 143, 144, 3(5) तसेच अनैतिक मानवी वाहतूक (प्रतिबंध) अधिनियमाच्या कलम 3, 4, 5 अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# दुकानातील कॉपर वायर चोरणारा आरोपी स्थानिक गुन्हे शाखेच्या ताब्यात

**आरंभ मराठी । धाराशिव**

दुकानातून मोठ्या प्रमाणात कॉपर वायर चोरी करणाऱ्या आरोपीला स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अटक करत गुन्ह्याचा पर्दाफाश केला आहे. या कारवाईत चोरीचा मुद्देमालही जप्त करण्यात आला आहे. दिनांक 23 एप्रिल रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक अमोल मोरे व त्यांचे पथक मालमत्ताविषयक गुन्ह्यांच्या तपासासाठी पेट्रोलिंग करत असताना, गोपनीय बातमीदारामार्फत महत्त्वाची माहिती मिळाली. पोलीस ठाणे शिराढोण येथील दाखल गुन्ह्यातील आरोपी धनाजी बाबुराव पवार (रा. आळणी फाटा, रेल्वे स्टेशन परिसर, ता. जि. धाराशिव) व शिवाजी सर्जेराव काळे (रा. अंदोरा, ह.मु. कन्हेरवाडी पाटी, ता. कळंब, जि. धाराशिव) यांनी मिळून चोरी केली असून, धनाजी पवार हा चोरीचा माल विक्रीसाठी वाशी फाटा येथे थांबलेला असल्याची खात्रीशीर माहिती मिळाली. या माहितीच्या आधारे पथकाने तत्काळ सापळा रचून वाशी फाटा येथे धाड टाकली व धनाजी पवार याला ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान त्याने साथीदार शिवाजी काळे याच्यासह सुमो (क्र. MH 14 CX 2377) वाहनाचा वापर करून शिराढोण येथील दुकानातून अंदाजे 200 ते 250 किलो कॉपर वायर चोरी केल्याची कबुली दिली. आरोपीकडून 17 किलो कॉपर वायर तसेच टाटा सुमो जीप असा एकूण 3 लाख 70 हजार 400 रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पुढील तपास सुरू असून फरार आरोपीचा शोध घेतला जात आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक रितू खोखर व अपर पोलीस अधीक्षक शफकत आमना यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक विनोद इज्जपवार यांच्या नेतृत्वाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक अमोल मोरे, सचिन खटके, अमोल चव्हाण, बळीराम शिंदे, अमोल निंबाळकर, राहुल नाईकवाडी, महिला पोलीस कर्मचारी शोभा बांगर व चालक विनायक दहिहंडे यांच्या पथकाने पार पाडली.




CMYK

# वाहने जीवघेणी ठरतात तेंव्हा.!



शिवाजी विठ्ठल चौगुले
मु.पो. मासा बेलेवाडी,
कागल-कोल्हापूर



....बेशिस्त वाहतूक हा आपला रस्त्यावरील मूलभूत अधिकार असल्यासारखी परिस्थिती ठाणे, मुंबई तसेच राज्याच्या इतर शहरात कायम असते. त्यामुळे होणाऱ्या रोजच्या अपघातांशी आपल्याला काहीएक देणेघेणे नाही. जोपर्यंत आपल्यातले कोणी अशा अपघातात बळी जात नाहीत किंवा जखमी होत नाहीत तोपर्यंत अशा अपघातांचे गांभीर्य आपल्यापर्यंत पोहचतच नाही. एका वाहनचालकाची किरकोळ वाटणारी छोटीशी चूक त्याच्यासह इतरांच्या जीवाला धोका निर्माण करते. सोबतच अपघातात जे बळी जातात त्यांच्या कुटुंबाचीही आयुष्यभराची फरफट होते. कोणत्याही अपघातात एकच माणूस बळी जात नाही, त्याच्यासोबत त्याच्या कुटुंबांच्या आनंदाचा, त्याच्या मुलाबाळांच्या भविष्याचा बळी जात असतो. एवढे बळी रोजच्या रोज रस्त्यावर जात असतानाही रस्त्यावरच्या वाहतूक नियमांविषयी आपण वाहनचालक नागरिक म्हणून गंभीर आणि सजग नसतो. कल्याणात झालेल्या भीषण अपघातात ११ जणांचा गेलेला बळी बेशिस्त वाहतुकीचे भीषण उदाहरण म्हणून समोर यावे. वाहतुकीचे नियम हे मोडण्यासाठीच असतात, पाळण्यासाठी नाही, असा एक सर्वव्यापी धोकादायक समज आपल्याकडे प्रचलित झालेला आहे.

सिग्नल तोडून पळून जाणे, ही आपल्याकडे भूषणावह बाब असते. वाहतूक पोलिसांना चकवून आपले वाहन कसे पुढे दामटवले याचे किस्से मोठे 'कर्तृत्त्व' गाजवल्यासारखे ऐकले ऐकवले जातात. काळी-पिवळी टॅक्सी, सीक्स किंवा तीन सीटर रिक्षा, सार्वजनिक खासगी वाहनांमध्ये जास्तीचे प्रवासी कोंबून भरण्याला आपलीही प्रवासी म्हणून मूक संमती असते. वाहतुकीचे कायदे ही सर्वात दुर्लक्षित करण्याची सार्वजनिक बाब असल्याचे आपण मान्य केलेलेच असते. घराबाहेर सार्वजनिक जीवनात असताना कित्येकदा आपण सजग नागरिक नसतोच, आपण जबाबदार वाहनचालकही नसतो. ओव्हरटेक करून वाहन पुढे दामटवण्यात आपल्याला जीवघेणे थ्रील वाटत असते. दुचाकीस्वारांना रस्त्यावरच्या वाहतुकीचा कमालीचा धोका असताना एकाच दुचाकीवर दुचाकीस्वार, त्याची पत्नी, एक किंवा दोन लहान मुलेही बसलेली दिसतात. एकाच वेळी रस्त्यावरच्या धोकादायक वेगात केवळ दोन चाकांच्या भरवशावर सामील झाल्याचे आपण रोज पाहतो. हेल्मेट परिधान करताना त्याचा गळ्याकडचा बेल्ट न लावण्यामागे केवळ आणि केवळ वाहतूक पोलिसांना गंडवण्याचा आपला उद्देश असतो, मात्र रस्त्यावरचा वाहतूक पोलीस त्याच्या वेतनासाठी रस्त्यावर ड्युटी करत नसून तो आपल्या सुरक्षेसाठी तिथे तैनात केलेला आहे, याविषयी आपल्याला काहीही सोयरसुतक नसते. हाच प्रकार चारचाकी वाहनातही सीट बेल्ट न लावण्याविषयी अंमलात आणला जातो. रस्त्यावर झेब्रा क्रॉसिंगच्या कितीतरी पुढे जाऊन आपले वाहन थांबवल्यावर वाहतूक विभागावर आणि इतर पादचारी नागरिकांवर 'मोठे उपकार' केल्याचा आपला आविर्भाव असतो. ॲम्ब्युलन्स, अग्निशमन दल पोलिसांच्या वाहनासाठी प्रगत देशांमध्ये राखीव लेन रस्त्यावर आखून दिलेल्या असतात, या लेनमध्ये शिरकाव करणे म्हणजे सार्वजनिक सुरक्षा धोक्यात आणल्याचे त्या ठिकाणी मानले जाते.

याउलट आपल्याकडे कायदा मोडणे हे मोठेपणाचे लक्षण मानले जाते. आपल्याकडे रस्त्यांवरील खड्डे म्हणजे अपघाताची सार्वकालीक कारणं ठरलेली आहेत. असे असताना वाहतुकीचे नियम मोडून अपघात ओढवून घेण्याची भीषण हौस आपल्यातील कित्येकांना असू शकते. सार्वजनिक रस्ता हा आपलीच खासगी मालमत्ता असून वाहनासोबतच आपण रस्ताही विकत घेतला आहे, अशा अविर्भावात रस्त्यावर अनेक वाहनचालकांचा वावर असतो. रिक्षा, टॅक्सी किंवा इतर खासगी सार्वजनिक वाहतूक सेवा देणाऱ्या वाहनचालकांमध्ये वाहतुकीचे नियम मोडण्याची जणू स्पर्धाच लागलेली असते. कुठलाही सिग्नल न देता प्रवासी भरण्यासाठी रस्त्यात अचानक वाहन थांबवणे, बाजूला घेणे, मध्येच प्रवासी उतरवणे आदी वाहतूक कायद्याचे उल्लंघन आपल्याकडे किरकोळ बाब मानली जाते. ते नेहमीच होत असते. दोन वाहनांमधील सुरक्षित अंतराचा संदेश हा केवळ सार्वजनिक वाहनांमागे शोभेच्या सुविचारापुरताच उरलेला असतो. तर खासगी लोखंडी डंपर, मिक्सर, मोठाले कंटेनर, टँकर असे वाहतुकीतले राक्षस रस्त्यावर उतरवणाऱ्या अवजड वाहन चालकांना इतर किरकोळ वाहन चालकांच्या जीवाचे मोल वाटत नाही. या लोखंडी राक्षसांना दुचाकीस्वाराने धडकल्यास किंवा अवजड वाहनाने दुचाकीला ठोकरल्यास दुचाकीचालकाचाच जीव जातो. ही मंडळी रस्त्यावर वाहतुकीबाबत कमालीची बेदरकार बेफिकीर असतात. रायगड जिल्ह्यात २०२५ या वर्षभरात ६५२ अपघातांची नोंद झाली. ज्यात २५९ जणांचा मृत्यू झाला. तर ५९८ जण जबर जखमी झाले. तर सन २०२४ मध्ये जिल्ह्यात ७३२ रस्ते अपघातांची नोंद झाली. अशीच परिस्थिती राज्यांच्या इतर जिल्ह्यांमध्येही थोड्याफार फरकाने आहे. वाहतुकीचे नियमन आणि अपघातांची संख्या कमी करण्याची जबाबदारी केवळ वाहतूक पोलिसांवर ढकलून चालणार नाही. रस्त्यावरून वाहने चालवताना आपल्यासोबत इतरांचीही सुरक्षितता लक्षात घ्यायला हवी. तशाच प्रकारे वाहने चालवायला हवी. वाहने ही जीवनाची गती वाढवण्यासाठी आहेत, पण ती गती जीवघेणी ठरू नये. कारण आपण जिंवत असलो तर सर्व काही आहे.

## महावितरणच्या मान्सूनपूर्व देखभाल, दुरुस्तीची पूर्वनियोजित कामे आता सकाळच्याच सत्रात होणार

आरंभ मराठी । धाराशिव



उन्हाळ्यात विजेच्या वाढत्या मागणीच्या कालावधीत आणि पावसाळी परिस्थितीत वीजपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी महावितरणकडून वीज यंत्रणेशी संबंधित विविध देखभाल व दुरुस्तीचे पूर्वनियोजित कामे सध्या वेगात सुरु आहे. मात्र उन्हाचा तडाख्यात नागरिकांची गैरसोय टाळण्यासाठी देखभाल व दुरुस्तीचे पूर्वनियोजित कामे संबंधित दिवशी सकाळी ७ ते ११ वाजेदरम्यान करावेत असे निर्देश मुख्यालयाकडून क्षेत्रीय कार्यालयांना शनिवारी (दि. २५) देण्यात आले. महावितरणची प्रामुख्याने पावसाळ्यात वीजयंत्रणा सज्ज ठेवण्यासाठी तसेच वीजपुरवठा खंडित होणे व वीजसुरक्षेचे धोके टाळण्यासाठी वीज ग्राहकांना पूर्वसूचना देऊन देखभाल व दुरूस्तीचे कामे वीजराज्यभरात सध्या सुरु आहे. साधारणतः मे महिन्याच्या अखेरीस सर्व कामे पूर्णत्वास जातात. मात्र सद्यस्थितीत सकाळी १० ते दुपारी २ किंवा चार वाजेपर्यंत वीज पुरवठा बंद ठेवत देखभाल व दुरुस्तीचे कामे सुरु आहेत. नागरिकांसाठी ही गैरसोयीची वेळ टाळण्यासाठी यापुढे संबंधित दिवशी व वीजवाहिनीच्या पूर्वनियोजित देखभाल व दुरुस्तीचे काम यापुढे सकाळी ७ ते ११ वाजेदरम्यान करण्याचे निर्देश मुख्यालयाकडून देण्यात आले आहे. महावितरणच्या देखभाल दुरुस्तीचे पूर्वनियोजित कामे करताना सर्वप्रथम प्राधान्याने पर्यायी वीजपुरवठा उपलब्ध करून देण्याचे तसेच संबंधित वीजग्राहकांना नोंदणीकृत मोबाईल क्रमांकावर 'एसएमएस'द्वारे तसेच प्रसिद्धी माध्यमांद्वारे कळविण्याचे निर्देश देण्यात आले आहे.मान्सूनपूर्व देखभाल व दुरूस्तीच्या पूर्वनियोजित कामांमध्ये प्रामुख्याने वीजवाहिन्यांना स्पर्श करणाऱ्या झाडांच्या छोट्या फांद्या तोडणे, तूटलेले पीन व डिस्क इन्सूलेटर्स बदलणे, वितरण रोहित्रे, फिडर पिलर, रिंगमेन युनिटचे अर्थिंग तपासणे, ऑइल फिल्टरेशन व ऑइल टॉपिंग अप, रोहित्राच्या वितरण पेटीची दुरुस्ती, नादुरुस्त लाईटनिंग अरेस्टर बदलणे, वीजखांब व तारांचे मजबुतीकरण, तारांमधील झोल काढणे, गंजलेले किंवा खराब झालेले वीजखांब बदलणे, जुन्या वीजतारा बदलणे, फिडर पिलरची साफसफाई व आवश्यकतेनुसार इन्सूलेशन स्प्रे मारणे, उच्च व लघुदाब वीजतारांना गार्डिंग करणे यासह उपकेंद्रातील ब्रेकर्सची दुरुस्ती, बॅटरी चार्जिंग, पॉवर ट्रान्सफॉर्मरची देखभाल व ऑइल टॉपिंग अप अशा व इतर विविध दुरुस्ती कामांसह वीजपुरवठ्याच्या पर्यायी यंत्रणा सज्ज करणे आदी कामे करण्यात येत आहेत.

# विनोदाचा बादशहा चार्ली चॅप्लिन



जगातला सर्वात लोकप्रिय अभिनेता, विनोदाचा बादशहा चार्ली चॅप्लिन याची आज जयंती आहे. पहिल्या महायुद्धाच्या अगोदाच्या काळात मुकपटात अभिनय करून आपल्या आगळ्या वेगळ्या शैलीने प्रेक्षकांना मनमुराद हसावणाऱ्या चार्ली चॅप्लिन यांचा जन्म १६ एप्रिल १८८९ रोजी लंडन येथे झाला. चार्ली चॅप्लिन यांनी आपल्या अभिनयाची सुरवात शालेय जीवनापासूनच केली. वयाच्या नवव्या वर्षी शाळेतल्या नृत्यपथकात त्यांची निवड झाली. या नृत्यपथकाद्वारे सादर होणाऱ्या कार्यक्रमात ते अभिनय आणि नृत्य करत. त्यांची आई मानसिक आजाराने त्रस्त असल्याने वयाच्या तेराव्या वर्षीच त्यांना शाळा सोडावी लागली. अर्थाजनासाठी ते लहान मोठे कामे करू लागले. घरची परिस्थिती हलाखीची असूनही त्यांनी आत्मविश्वास कमी होऊ दिला नाही. परिस्थितीने उलट त्यांना खंबीर बनवले. त्यावेळेच्या परिस्थितीबद्दल चार्ली चॅप्लिन आपल्या आत्मचरित्रात म्हणतात 'मला त्या परिस्थितीचे चटके फार काळ सहन करावे लागले नाही कारण आम्ही त्या परिस्थितीतून सतत वाटचाल करत होतो आणि लहान असल्यामुळे हा त्रास मी सहज विसरून जायचो.' त्यांचा आत्मविश्वास कणखर होता छोटीमोठी कामे करूनही ते कधीही आपल्या ध्येयापासून ढळले नाहीत. मोठा अभिनेता होण्याचे ध्येय पूर्ण करण्यासाठी ते नाटक कंपन्यांना नित्यनियमाने संपर्क साधत. त्यांच्या मेहनतीला फळ मिळाले त्यांना अनेक नाटकात भूमिका मिळू लागल्या. पुढे मोठया पडद्यावर देखील त्यांना संधी मिळत गेली. पडद्यावरील त्यांचे मस्तमौला आगळेवेगळे रूप प्रेक्षकांना खूप भावले. पडद्यावर त्यांची इन्ट्री झाली की प्रेक्षक खळखळून हसत. एक टाईट कोट, छोटी हॅट, मोठे शूज आणि चेहऱ्यावरील छोटीशी मिशी असं त्यांचं पडद्यावरील वेडगळ रूप प्रेक्षकांना खूप भावले. हे वेडगळ रूप प्रेक्षकांना इतकं आवडलं की पुढं हेच त्यांचं वेडगळ रूप त्यांची ओळख बनली. या व्यक्तिरेखेबद्दल ते आपल्या आत्मचरित्रात म्हणतात ' ज्या क्षणी मी तो पोशाख केला, मेकअप केला, त्याच क्षणी मी ती व्यक्तिरेखा अनुभवू लागलो. मी त्याला ओळखयचो आणि रंगमंचावर असेपर्यंत तो माझ्यात भिनलेला असायचा.' चार्ली चॅप्लिन यांनी आयुष्याचं सार पडद्यावर अनेक तऱ्हेने जगपुढे मांडले. खिल्ली उडवण्यासाठी दुःख हे कारण असतं. खिल्ली उडवणे म्हणजे प्रतिकार करणे निसर्गाच्या शक्तीपूढे स्वतःच्या हतबलतेतही आपण हसत राहिले पाहिजे. प्रतिकुलतेचा हसत हसत सामना केला पाहिजे, नाहीतर मानसिकरीत्या खचून जाल असे ते म्हणत म्हणूनच त्यांच्या आयुष्याच्या जवळचा चित्रपट ' द कीड ' याचं ओपनिंग टायटल होतं' अ पिक्चर विथ अ स्माईल अँड परहॅप्स अ टियर.' स्वतःच दुःख विसरून आईचे स्वप्न साकार करण्यासाठी त्यांनी पडद्यावर वेडगळ भूमिका करुन जगभरातील प्रेक्षकांच्या मनावर राज्य केले. भाषेच्या बंधनाविना पडद्यावरून तो कुठल्याही प्रेक्षकांशी संवाद साधू शकला त्यासाठी त्यांनी वापरलेले साधन म्हणजे भरपूर हासू आणि थोडेसे आसू. चार्ली चॅप्लिन यांच्या अभिनयाचे वैशिष्ट्य म्हणजे ते प्रेक्षकांना गडबडा लोळायला लावून हसवत आणि दुसऱ्याच क्षणी डोळ्यात पाणी आणून रडवत. आत्मविश्वासाच्या जोरावर त्यांनी अनेक युक्त्या करून त्या पडद्यावर साकारल्या आणि गाजवल्या. जागतिक पटलावर महानायक म्हणून ते आयुष्यभर वावरले. पहिल्या महायुद्धाच्या काळातही त्यांनी लोकांना हसवण्याचे कार्य केले. २५ वर्षानंतर जागतिक मंदी आणि हिटलरच्या काळातही त्यांनी प्रेक्षकांना हसवण्याचे कार्य थांबवले नाही. लोकांना ज्याकाळात मनोरंजनाची आणि हास्याची अधिक गरज होती त्याकाळात चार्ली चॅप्लिन यांनी लोकांसाठी उत्तम भूमिका बजावल्या. २५ डिसेंबर १९७७ रोजी प्रेक्षकांना खळखळून हसवणारा हा महान अभिनेता पप्रेक्षकांना दुःख सागरात लोटून काळाच्या पडद्याआड गेला. चार्ली चॅप्लिन यांना जयंतीदिनी भावपूर्ण आदरांजली.

श्याम ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

# मुलांचे करिअर निवडताना

शिक्षण आणि मुलांचे करिअर हे आजच्या घडीला पालकांसमोरील अत्यंत महत्त्वाचे प्रश्न झाले आहेत. दहावीनंतर आपल्या पाल्याला चांगल्या कॉलेजमध्ये प्रवेश मिळावा, त्याच्या आवडीच्या शाखा त्याला मिळावी अशी पाल्य आणि पालक या दोघांची इच्छा असते. त्यासाठी करिअर समुपदेशक यांचा सल्ला घेतला जातो. आज जागोजागी करिअर काउन्सिलर उपलब्ध आहेत.त्यांची वेगवेगळी काउन्सिलर केंद्रे आहेत. त्याद्वारे मार्गदर्शन आणि समुपदेशन करण्याचे काम केले जाते.हे जरी सगळं उपलब्ध असलं तरी आपल्या पाल्याच्या आयुष्याला दिशा देणारा निर्णय घेताना घाई न करता विचारपूर्वक घेणे आवश्यक आहे. अन्यथा नंतर पश्चात्ताप होऊ शकतो. मुलाचे करिअर बरबाद होऊ शकते.आपल्या पाल्याच्या करिअर बाबत निर्णय घेताना पाल्याला विश्वासात घ्यावे.त्याच्याशी मनमोकळेपणे संवाद साधावा.त्याच्याशी चर्चा करावी. आपल्या पाल्याची आवड आणि कल जाणून घ्यावा.गरज असेल तर त्याची कलचाचणी करुन घ्यावी.त्याची बुद्धिमत्ता पाहावी.आपल्या पाल्याची नैसर्गिक आवड कोणत्या क्षेत्राकडे आहे.त्याच्या सशक्त बाजू कोणत्या आहेत. तो कोणत्या बाबतीत कमकुवत आहे लक्षात घ्यावं.त्याची उपजत आवड आणि कौशल्य या बाबींकडे दुर्लक्ष करु नये.त्याच्या आवडीच्या क्षेत्रात पुढे जाण्यासाठी त्याला मोकळीक द्यावी. आपल्या इच्छा,आकांक्षा मुलांवर लादू नयेत. त्यांच्यावर दडपण येणार नाही याची काळजी घ्यावी.आपल्या करिअर बाबत निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य मुलांना असावे.त्यांना प्रोत्साहन द्यावे. त्यांच्यातील आत्मविश्वासाला बळ द्यावे. आकाशात उंच भरारी घेण्याचे त्यांचे स्वप्न पूर्ण होण्यासाठी पालक म्हणून त्यांना प्रेरित करावं. प्रत्येक वेळी मुलांच्या पाठीशी खंबीरपणे उभे रहावे.त्यांच्यावर अपेक्षांचे ओझे लादू नये. त्यांना मानसिक ताण न देता मुक्तपणे करिअर घडविण्यासाठी पाठबळ द्यावे.मुलांच्या आवडीच्या क्षेत्रात करिअर झाले तर त्यात मनापासून रमतात.परंतु पालकांच्या इच्छेखातर न आवडणाऱ्या शाखेला प्रवेश झाला तर त्यांना तो अभ्यासक्रम पूर्ण करताना अडचणी येतात. मुलांच्या मनात न्यूनगंड निर्माण होतो.त्यांचा आत्मविश्वास खचतो.शिक्षणाबाबत मनात नैराश्य येते.मनावर दडपण येते.कालांतराने चुकीचे पाऊल उचलणे जाण्याची शक्यता असते. कधीकधी जीवनाचा शेवटही करतात. माहिती तंत्रज्ञानाच्या युगात आज वेगवेगळ्या क्षेत्रात करिअरच्या भरपूर संधी आहेत. ज्ञानाबरोबरच कौशल्याधिष्ठित शिक्षणाला खूप महत्त्व आहे. मुलांची आवड पाहून त्यांना संधी दिली तर त्यांचे करिअर उत्तम घडू शकते.यासाठी पालक म्हणून आपली भूमिका खूप महत्वाची आहे.करिअर निवडताना फक्त पैसे मिळविणे हा हेतू नसावा तर त्या करिअरमधून पाल्याला आनंद मिळाला पाहिजे.

लक्ष्मण जगताप
बारामती
लेखक शिक्षक आहेत.

## ऐतिहासिक भिडेवाडा चित्ररथाचे धाराशिव शहरात उत्साहपुर्ण वातावरणात भव्य स्वागत

आरंभ मराठी । धाराशिव

क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या द्विशताब्दी वर्षानिमित्त क्रांतीसुर्य महात्मा जोतीराव फुले व ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांचे वीचार तळागाळातील लोकाप्रयंत पोहचावेत यासाठी समता परिषदेचे संस्थापक अध्यक्ष तथा राज्याचे मंत्री छगन भुजबळ यांच्या नेतृत्वाखाली आणि समता परिषदेचे कार्याध्यक्ष माजी खासदार समीर भुजबळ,आमदार पंकज भुजबळ यांच्या संकल्पणेतुन तयार करण्यात आलेल्या क्रांतीसुर्य महात्मा जोतीबा फुले आणि ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांनी पुण्यातील भीडे वाडा येथे सुरू केलेल्या पहिल्या मुलीच्या शाळेचा भिडे वाडा चीत्ररथाचे धिराशिव शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात उत्साहपुर्ण वातावरणात भव्य स्वागत करण्यात आले. शनिवार दिनांक 25 एप्रिल रोजी सायंकाळी 4 वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौक धाराशिव येथे या चित्र रथाचे आगमण झाले. याप्रसंगी समता परिषदेचे मराठवाडा विभागिय अध्यक्ष आबासाहेब खोत, जिल्हाध्यक्ष बिभिषण खुणे,तेली समाज संघटनेचे जिल्हाध्यक्ष रवि कोरे आळणीकर यांनी सदरिल ' भिडेवाडा ' भारातील पहिली मुलीची शाळा या चित्र रथाचे आगमण झाल्यानंतर फटाक्याची आतिशबाजी करत स्वागत केले. हा रथ म्हणजे केवळ एक प्रतीकृती नाही तर शिक्षण समता, सामाजिक जागरूकतेचा गीत आहे.मुलींच्या शिक्षणासाठी ज्यांनी लढा दिला त्या महान कार्याची आठवण करून देणारा जिवंत प्रेरणा रथ आहे. या पार्श्वभूमीवर धाराशिव शहरात शनिवार रोजी सायंकाळी 4 वाजयात या चित्र रथाचे आगमण झाले.धाराशिव तालुका अध्यक्ष व्यंकट जाधव,भुम तालुका अध्यक्ष संतोष डोरले,कळंब तालुकाध्यक्ष प्रशांत वेदपाठ,वाशी तालुका अध्यक्ष मुण्णा कोरे,परंडा तालुका अध्यक्ष सुरेंद्र भोजणे,तेली समाज संघटनेचे युवक जिल्हाध्यक्ष शशिकांत बेगमपुरे,मोशीन शेख,नंदू कुर्हाडे,बब्लू पवार,कृणा चौगुले,सुनिल कुर्हाडे,भजनदास जगताप,अनंता भोसले,नाना वाघे, राजेन्द्र जाधव,बालाजी गोरे, दिलीप म्हेत्रे

## सीतामाता जन्मोत्सव उत्साहात; जनतेच्या कल्याणासाठी प्रार्थना

**धाराशिव :-** शहरातील श्रीराम पंचायतन मंदिर परिसर भक्तीभावाने न्हाऊन निघाला. सीतामाता जन्मोत्सव समिती, धाराशिवच्या वतीने जगतमाता सीता नवमीचा उत्सव पारंपरिक पद्धतीने आणि उत्साहात साजरा करण्यात आला. दीपप्रज्वलन आणि आरतीने कार्यक्रमाची सुरुवात झाली. यावेळी केवळ धार्मिक विधीच नव्हे, तर सध्याच्या जागतिक परिस्थितीची जाणीवही व्यक्त झाली. जगभर सुरू असलेले युद्धाचे संकट लवकरात लवकर टळावे आणि सर्वसामान्य नागरिकांना होत असलेला त्रास कमी व्हावा, अशी सामूहिक प्रार्थना उपस्थित भक्तांनी सीतानवमीच्या निमित्ताने केली. समितीच्या अध्यक्षा सौ. सगुणाताई आचार्य यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम पार पडला. यावेळी सौ. स्मिता जोशी, मंजिरी चिंचपूरकर, श्वेता किरकसे, आरती खरोसेकर, पूजा आचार्य, अन्नपूर्णा कुळकर्णी, वंदना थिटे, सुवर्णा कुलकर्णी, शोभा कठारे, सुनीता शिंदे, लता चौधरी, गौरी चौधरी, सविता वरुडकर, अश्विनी कुलकर्णी, सुजाता देव, सुरेखा कुलकर्णी, पूजा कुलकर्णी यांच्यासह महिलांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# तुळजापूरात शिंदे शाहीच्या सुरेल मैफिलीत भीम अनुयायी मंत्रमुग्ध

### डॉ. साक्षी मल्हार पाटील व मल्हार पाटील यांच्या वतीने भीम गीतांच्या कार्यक्रमाची सुरेल मैफिल

आरंभ मराठी । तुळजापूर



सोनियाची उगवली सकाळ जन्मास आले भिम बाळ... चांदण्यांची छाया कापराची काया माऊलीची माया होता माझा भिमराया, कुणी नाही केल भलं व माय भिमानं केलं आहे कुणाच योगदान लाल दिव्याच्या गाडीला या सुप्रसिद्ध गायक चंद्रकांत शिंदे यांच्या भिम गीतांनी भिम अनुयायी तुळजापूरात मंत्रमुग्ध झाले. शुक्रवारी (दि.२४) तुळजापूर शहरातील हडको मैदान येथे आ. राणाजगजितसिंह पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली भारतीय जनता पार्टीचे युवा नेते मल्हार राणाजगजितसिंह पाटील सौ. डॉ साक्षी मल्हार पाटील यांच्या वतीने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्ताने सुप्रसिद्ध गायक चंद्रकांत शिंदे, इंडियन आयडॉल फेम डॉ. श्वेता दांडेकर यांच्या शिंदेशाही सुरांच्या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. आंबेडकरी समाजातील महिला, पुरुष बांधवांनी उस्फुर्त प्रतिसाद देत भिम गितांनी प्रेक्षक मंत्रमुग्ध झाले. प्रथम जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा अर्चनाताई राणाजगजितसिंह पाटील, नगराध्यक्ष विनोद गंगणे,जि प सदस्य सुनील बनसोडे, विद्याताई माने जि. प सदस्य दयानंद शिंदे,पंचायत समिती चे सदस्य किसन देडे यांच्या हस्ते डॉबाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले महात्मा बसवेश्वर आण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन प्रथम तु वंदन गौतमा या वंदन गीताने कार्यक्रमास सुरुवात केली. सुप्रसिद्ध गायक चंद्रकांत शिंदे यांनी सोनियाची उगवली सकाळ जन्मास आले भिम राव, या भिम गीताने सुरूवात करून सुरेल मैफिलीत रंगत भरली. यानंतर चांदण्यांची छाया कापराची काया माऊलीची माया होता माझा भिमराया, कुणी नाही केल भलं व माय भिमानं केलं दिल्लीचं दालन खुलवं माय भिमा केलं, जरी संकटाची काळ रात्रं होती... राजा राणीच्या जोडीला पाच मजली माडिला आहे कुणाच योगदान लाल दिव्याच्या गाडीला... अशा एकाहून एक सरस भीम गीतांनी रसिक मंत्रमुग्ध झाले.

हे पत्र मालक, मुद्रक, संपादक चंद्रसेन गोविंदराव देशमुख यांनी आदेश प्रिंटर्स, रामकृष्ण कॉलनी,गवळी वाडा धाराशिव, ता. जि. धाराशिव, येथे छापुन रामकृष्ण कॉलनी, गवळी वाडा, धाराशिव (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. (न्यायीक क्षेत्र धाराशिव)
संपादक श्री. चंद्रसेन गोविंदराव देशमुख. मो.नं. ९८२२५९३९८० RNI NO.-2023/90078 कार्यालय; सुकर्मा कॅपिटल, बार्शी नाका, जिजाऊ चौक, धाराशिव-४१३५०१.मो. ९४२२०६८४२२. This letter was published by owner, printer, editor Chandrasen Govindrao Deshmukh, printed at Aadesh Printers, Ramkrishna Colony, Gawli Wada Dharashiv, Ta. Dist. Dharashiv, and published at Ramkrishna Colony, Gawli Wada, Dharashiv (Maharashtra).
पुणे कार्यालयः1012,विंग B, पूर्वांचल,वेबग्योर स्कुलशेजारी, वाघोली,पुणे.

# विद्याभवन हायस्कुलसमोर रात्री ८ नंतर ‘धिंगाण्याची शाळा’

## नागरिक त्रस्त, पोलिसांनी लक्ष देण्याची रहिवाशांची मागणी





आरंभ मराठी

**कळंब : कळंब शहरातील सावरगाव (पु.) भागातील विद्याभवन हायस्कुल समोरील परिसरात रात्री ८ नंतर धिंगाणा घालणाऱ्या टोळक्यांचा त्रास दिवसेंदिवस वाढत असून परिसरातील नागरिक हैराण झाले आहेत. मोठमोठ्याने आरडाओरडा, अर्वाच्य भाषेत शिवीगाळ, तसेच वाहनांचे कर्णकर्कश हॉर्न वाजवत गोंधळ घालणे हे प्रकार रात्री उशिरापर्यंत सुरूच असतात. त्यामुळे येथील रहिवाशी हैराण झाले असून धिंगाणा घालणाऱ्या टोळक्यांचा बंदोबस्त करावा अशी मागणी करण्यात येत आहे.**

विद्याभवन हायस्कूल ही शाळा कळंबमधील जुनी व प्रतिष्ठित शाळा म्हणून ओळखली जाते. शाळेच्या पाठीमागे शिक्षक कॉलनी असून परिसरात वकील, डॉक्टर, प्राध्यापक तसेच विविध मान्यवरांची घरे आहेत. याच ठिकाणाहून शहरातील बायपास रस्ताही जात असल्याने हा परिसर नेहमीच वर्दळीचा असतो. मात्र रात्रीच्या वेळी येथे असामाजिक घटकांचा वावर वाढत असल्याचे दिसून येते. मिळालेल्या माहितीनुसार, रात्रीच्या वेळी काही युवक शाळेसमोरील रस्त्यावर व परिसरात मोठ्या आवाजात गप्पा, आरडाओरडा, तसेच दुचाकींची वेगाने ये-जा करत धिंगाणा घालत असतात. अनेकदा मोठ्या आवाजात गाणी लावणे, शिट्ट्या मारणे, अशा प्रकारांमुळे शांतता भंग होत आहे. यामुळे विशेषतः वयोवृद्ध, महिला आणि विद्यार्थ्यांना त्रास सहन करावा लागत आहे. परिसरातील नागरिकांनी सांगितले की, हा प्रकार रोजचाच झाला असून अनेक वेळा समज देऊनही संबंधित युवकांकडून कोणतीही दखल घेतली जात नाही. रात्री उशिरापर्यंत चालणाऱ्या या गोंधळामुळे झोपेचा व्यत्यय येत असून सुरक्षिततेबाबतही भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

### पोलिसांचा धाक कमी झाल्याची भावना

या भागातून पोलिसांची गस्त असतानाही अशा घटना सुरूच कशा राहतात, असा सवाल नागरिक उपस्थित करत आहेत. “पोलिसांना हे चित्र दिसत नाही का? आणि दिसत असेल तर कारवाई का होत नाही?” असा संतप्त प्रश्न नागरिक विचारत आहेत. या टोळक्यांमध्ये वादही होत असून भविष्यात गंभीर घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही.

### तात्काळ कारवाईची मागणी

परिसरातील नागरिकांनी पोलिस प्रशासनाने या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन रात्रीच्या गस्तीत वाढ करावी, संबंधितांवर कडक कारवाई करावी आणि परिसरात प्रकाशयोजना सुधारावी, अशी मागणी केली आहे. पोलिसांनी पोलिसी खाक्या दाखविण्याची वेळ आली असून टोळक्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी प्रयत्न करावेत अशी मागणी होत आहे.

### रात्रीचा अंधार आणि मोकळे मैदान ठरते अड्डा

शाळेसमोरील परिसरात पुरेशा प्रकाशयोजनेचा अभाव आणि मोकळे मैदान असल्याने टोळक्यांना येथे सहज जमण्याची संधी मिळत आहे. काही जण गटागटाने बसून गप्पा मारतात, तर काही जण गाड्यांचे हॉर्न वाजवत आणि गोंधळ घालत वेळ घालवतात. यामुळे परिसरातील शांतता भंग होत असून रहिवाशांना त्रास सहन करावा लागत आहे.

### पालकांचेही दुर्लक्ष कारणीभूत

या उपद्रवात सहभागी असलेले बहुतांश युवक १६ ते २१ वयोगटातील असल्याचे समोर येत आहे. पालकांनी आपल्या मुलांच्या हालचालींकडे दुर्लक्ष केल्यामुळे ही परिस्थिती निर्माण होत असल्याची भावना व्यक्त केली जात आहे. वेळेत नियंत्रण न ठेवल्यास एखादी अघटित घटना घडण्याची भीती व्यक्त होत आहे.

## चारधाम यात्रा मावंदे निमित्त आष्टा (जहागीर) येथे भागवत कथा व भक्तिमय सोहळ्यांची सांगता

आरंभ मराठी । उमरगा



उमरगा तालुक्यातील आष्टा (जहागीर) येथे सद्भक्त मोहणराव कृष्णाजी गायकवाड व सौ. भारताबाई मोहणराव गायकवाड या दांपत्याने चारधाम यात्रा पूर्ण केल्याच्या मावंदे निमित्ताने श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळ्याचे दि. १९ ते २५ एप्रिल दरम्यान त्यांच्या निवासस्थानी आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्यामुळे गावात सात दिवस भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरण निर्माण झाले होते. या दरम्यान ह.भ.प. कैवल्य (भाऊमहाराज) चातुर्मास्ये पंढरपूरकर यांनी श्रीमद् भागवत कथेचे सुंदर व रसाळ निरूपण करत भाविकांना अध्यात्मिक मार्गदर्शन केले. सातही दिवस कथा नित्यनियमाने पार पडत भक्तांनी मोठ्या श्रद्धेने सहभाग घेतला. दि. २४ एप्रिल रोजी सकाळी काशी मावंदे निमित्त यज्ञ-याग, गंगापूजन व होमहवन विधी पार पडले. त्यानंतर दिवसभर भाविकांसाठी महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. शनिवारी रोजी ज्ञानेश्वरी ग्रंथाची दिंडी टाळ-मृदुंग, फटाक्यांची आतषबाजी आणि नामघोषाच्या गजरात गावातील प्रमुख मार्गावरून काढण्यात आली. त्यानंतर दामोदर मठसंस्थानचे मठाधिपती १००८ महंत अवधूतपुरी महाराज यांच्या उपस्थितीत गोपाळकाला निमित्त किर्तनसेवा पार पडली. या सोहळ्यास ह.भ.प. हणुमंत खपाले दासुरकर, ह.भ.प. रोहित तरंगे वाकाटीकर, ह.भ.प. बाळु जाधव खोरोचीकर, ह.भ.प. कृष्णा जमादार तुरोरीकर तसेच बाळकृष्ण (अनिल) गायकवाड, चि. हर्षवर्धन (चंद्रशेखर) राहुल गायकवाड यांच्यासह गावातील सरपंच सतीश जमादार, उपसरपंच, बापुराव गायकवाड, पोलीस पाटील महेश जाधव आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ज्ञानोद्योग विद्यालयाच्या तीन विद्यार्थीनींची NMMS शिष्यवृत्तीसाठी निवड

आरंभ मराठी । येरमाळा

येरमाळा येथील ज्ञानोद्योग विद्यालयाच्या तीन विद्यार्थीनींनी राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती (NMMS) परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत शाळेचा गौरव वाढविला आहे. मयुरी मारुती बारकुल, प्रतिमा सुखदेव गायके आणि पायल बालाजी काळे या तीनही विद्यार्थीनींनी NMMS शिष्यवृत्तीसाठी पात्रता मिळवली आहे. त्यांच्या या यशामुळे परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून शाळेचे नाव उंचावले आहे. या यशस्वी विद्यार्थीनींचे शाळेचे मुख्याध्यापक सुनिल पाटील सर, शिक्षकवृंद व पालकांनी कौतुक केले. विद्यार्थिनींच्या या यशामागे त्यांचा नियमित अभ्यास, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि पालकांचे सहकार्य महत्त्वाचे ठरले आहे.

## मंथन परीक्षेत सुतीर्थ व्यासचा राज्यात १७ वा क्रमांक



**धाराशिव :-** धाराशिव येथील लोकसेवा समिती संचलित आर्य चाणक्य प्राथमिक विद्यालयातील इयत्ता पहिलीतील विद्यार्थी सुतीर्थ पद्मनाभ व्यास याने राज्यस्तरीय मंथन सामान्य ज्ञान स्पर्धा परीक्षा - २०२६ मध्ये उल्लेखनीय यश संपादन केले. या परीक्षेत सुतीर्थने १५० पैकी ११८ गुण मिळवत राज्यात १७ वा क्रमांक पटकावला. तसेच जिल्हास्तरावर १२ वा, तालुकास्तरावर ५ वा क्रमांक मिळवित आपल्या गुणवत्तेची छाप पाडली. याशिवाय त्याने आपल्या केंद्रातून प्रथम येण्याचा बहुमानही मिळविला आहे. सुतीर्थच्या या यशाबद्दल लोकसेवा समिती, धाराशिव तसेच आर्य चाणक्य प्राथमिक विद्यालयाच्या वतीने त्याचा सत्कार करण्यात आला.

## पंचायत समितीतर्फे रुईभर येथे जनता दरबार; विविध विभागांच्या समस्यांचे तत्काळ निवारण

आरंभ मराठी । धाराशिव



आमदार राणाजगजीतसिंह पाटील यांच्या सूचनेनुसार रुईभर (ता. धाराशिव) येथे शनिवारी जनता दरबाराचे आयोजन करण्यात आले होते. या दरबारास धाराशिव पंचायत समितीच्या सभापती गोकर्णा गोपाळ कदम व उपसभापती प्रमोद पाटील यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रम पार पडला.या वेळी बेंबळी गटाचे जिल्हा परिषद सदस्य महेंद्र काका धुरगुडे, रुईभर गणाच्या पंचायत समिती सदस्य सौ. सुचिता ताई पाटील, प्रशांत रणदिवे, निखिल पेठे, सहाय्यक गटविकास अधिकारी नलावडे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. गिरी, विस्तार अधिकारी पंचायत श्री. ढाकणे, माजी जि.प. सदस्य रामदास अण्णा कोळगे, रुईभरच्या सरपंच कल्याणी ताई लोमटे, भगीरथ लोमटे, बाळासाहेब गोरे, अनसुरडा येथील सरपंच श्री. माने आदींसह विविध मान्यवर उपस्थित होते. यावेळी रुईभर गणातील सर्व सरपंच, उपसरपंच, बूथ प्रमुख, कार्यकर्ते, अंगणवाडी सेविका, सुपरवायझर, बचत गट महिला तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच ग्रामसेवक, आरोग्य केंद्रातील अधिकारी, पशुसंवर्धन विभाग, जिल्हा परिषद व पंचायत समितीचे अभियंते आणि विविध विभागांचे प्रमुख अधिकारी व कर्मचारी यांचीही उपस्थिती होती.जनता दरबारात बांधकाम, आरोग्य, घरकुल, पाणीपुरवठा, मनरेगा (एमआरईजीएस), पशुसंवर्धन, शिक्षण, अंगणवाडी, तहसील व महावितरण (एमएसईबी) आदी विभागांशी संबंधित नागरिकांच्या समस्या ऐकून त्यापैकी अनेक समस्यांचे तत्काळ निवारण करण्यात आले. उर्वरित प्रलंबित समस्यांबाबत निवेदने स्वीकारून त्या पुढील दहा दिवसांत सोडविण्याचे आश्वासन देण्यात आले. यावेळी विविध शासकीय योजनांची माहिती नागरिकांना देण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक रुईभरचे ग्रामविकास अधिकारी श्री. कुंभार यांनी केले, तर आभार प्रदर्शन गौडगावचे ग्रामसेवक सुरवसे यांनी केले.

## अखिल भारतीय बालरोग तज्ज्ञ संघटनेकडून ३०० पुस्तकांचे दान




आरंभ मराठी । धाराशिव

जागतिक पुस्तक दिनाचे औचित्य साधून सामाजिक बांधिलकी जपत तसेच महाविद्यालयाकडून करण्यात आलेल्या आवाहनाला प्रतिसाद देत अखिल भारतीय बालरोग तज्ज्ञ संघटना, शाखा धाराशिव तर्फे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, धाराशिव येथे ३०० पुस्तकांचे दान करण्यात आले. ही पुस्तके महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. शैलेंद्र चव्हाण यांना सुपूर्द करण्यात आली. यावेळी संघटनेचे अध्यक्ष डॉ. दत्तात्रय खुणे, सचिव डॉ. नितीन भोसले, तसेच डॉ. अभय शहापूरकर, डॉ. संजय सोनटक्के, डॉ. श्रीनिवास हंबिरे, डॉ. अभिजीत बागल आणि डॉ. अक्षय देशमुख उपस्थित होते. सर्व मान्यवरांनी या उपक्रमामागील सामाजिक जाणीव आणि शैक्षणिक बांधिलकी अधोरेखित केली.बालरोग विभागातील डॉ. मनोज घोगरे, डॉ. शाम चौधरी आणि डॉ. निलोफर भोरी यांनी ही पुस्तके स्वीकारली व विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी त्याचा निश्चितच उपयोग होईल, असे सांगितले.अखिल भारतीय बालरोग तज्ज्ञ संघटना, धाराशिव शाखा भविष्यातही अशा प्रकारचे सामाजिक व शैक्षणिक उपक्रम राबविण्यास कटिबद्ध असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले.

आरंभ मराठी

### खरिपाच्या तोंडावर बंद पुकारल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढणार

## कृषी निविष्ठा विक्रेत्यांचा उद्यापासून बेमुदत संप

आरंभ मराठी । धाराशिव




धाराशिव जिल्ह्यातील कृषी निविष्ठा विक्रेत्यांनी आपल्या विविध प्रलंबित मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी सोमवारपासून (दि.२७) बेमुदत संप पुकारण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. धाराशिव जिल्हा फर्टिलायझर्स, पेस्टिसाइड्स, सीड्स डीलर्स असोसिएशनच्या वतीने हा निर्णय जाहीर करण्यात आला असून, येत्या २७ एप्रिल २०२६ पासून जिल्ह्यातील सर्व कृषी सेवा केंद्रे, खत, बियाणे व कीटकनाशके विक्री करणारी दुकाने पूर्णतः बंद ठेवण्यात येणार आहेत. खरीप हंगाम अगदी तोंडावर आला असताना या बंदच्या निर्णयामुळे शेतकरी वर्गात चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. शेतीसाठी अत्यावश्यक असणारी बियाणे, खते आणि कीटकनाशके यांचा पुरवठा ठप्प होण्याची शक्यता असल्याने पेरणीपूर्व तयारीवर परिणाम होणार आहे. संघटनेने जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, कृषी निविष्ठा विक्रेत्यांवर शासनाकडून सातत्याने विविध नियम व अटी लादल्या जात असून त्यातून अनेक व्यावहारिक अडचणी निर्माण होत आहेत. या समस्यांवर तोडगा काढण्यासाठी अनेक वेळा पाठपुरावा करूनही शासनाकडून ठोस निर्णय घेतला गेलेला नाही. परिणामी, राज्यस्तरीय निर्देशानुसार आंदोलनाचा मार्ग स्वीकारण्याशिवाय पर्याय उरला नसल्याचे संघटनेचे म्हणणे आहे. राज्यव्यापी ‘माफदा’ संघटनेच्या आवाहनानुसार धाराशिवसह संपूर्ण राज्यातील कृषी निविष्ठा विक्री केंद्रे बेमुदत बंद ठेवण्यात येणार आहेत. स्थानिक पातळीवर धाराशिव जिल्ह्यातील सर्व विक्रेते या आंदोलनात सक्रिय सहभाग घेणार असल्याची माहिती संघटनेचे सचिव उदय तीर्थकर यांनी दिली. यासंदर्भात संघटनेचे अध्यक्ष विठ्ठलराव बदोले, कोषाध्यक्ष चंद्रसेन पिसाळ आणि सचिव उदय तीर्थकर यांच्या शिष्टमंडळाने शुक्रवारी जिल्हा कृषी अधिकारी राजकुमार मोरे यांची भेट घेऊन आपल्या मागण्यांचे निवेदन सादर केले. मागील पाच वर्षांपासून सातत्याने विविध मुद्दे शासनासमोर मांडले जात असतानाही त्यावर कोणतीही ठोस कार्यवाही न झाल्याची खंत यावेळी व्यक्त करण्यात आली. विक्रेत्यांच्या म्हणण्यानुसार, क्षेत्रीय पातळीवर त्यांच्याविरोधात सातत्याने कारवाया केल्या जात आहेत, तसेच काही कंपन्यांकडून ‘लिंकिंग’ सारख्या अटी लादल्या जात आहेत. यामुळे व्यवसाय करणे अधिक कठीण होत असून शासनाकडून या समस्यांकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोपही त्यांनी केला आहे. दरम्यान, राज्यातील सर्व जिल्ह्यांतील स्थानिक संघटनांनी या बेमुदत बंदला पाठिंबा दर्शविला असून आंदोलन अधिक तीव्र होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

## अवकाळी पावसामुळे नुकसान झालेल्या पपई बागेची सभापती खरसडे यांच्याकडून पाहणी



आरंभ मराठी । परंडा

परंडा तालुक्यातील शिरसाव येथील शेतकरी शहाजी मिसाळ यांच्या ९ एकरांवरील पपई बागेचे अवकाळी पाऊस व गारपिटीमुळे मोठे नुकसान झाले असून संपूर्ण बाग अक्षरशः जमीनदोस्त झाली आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हा परिषद धाराशिवचे पशुसंवर्धन व कृषी सभापती भाऊसाहेब खरसडे यांनी नुकसानग्रस्त शेताची पाहणी करून परिस्थितीचा आढावा घेतला. अचानक आलेल्या वादळी वाऱ्यासह जोरदार पावसामुळे उभे पिक कोसळून मोठ्या प्रमाणात हानी झाली आहे. मेहनतीने उभा केलेला हिरवा संसार एका रात्रीत उद्ध्वस्त झाल्याने शेतकरी मिसाळ हे हवालदिल झाले आहेत. पाहणीदरम्यान खरसडे यांनी संबंधित अधिकाऱ्यांशी दूरध्वनीद्वारे संपर्क साधून तात्काळ पंचनामे करण्याचे निर्देश दिले. धाराशिव येथील कृषी अधीक्षक मोरे तसेच तहसीलदार निलेश काकडे यांना आवश्यक सूचना देत नुकसानग्रस्त शेतकऱ्याला शासनाकडून जास्तीत जास्त आर्थिक मदत मिळावी, यासाठी प्रशासनाने त्वरित कार्यवाही करावी, असे स्पष्ट केले. अवकाळी पावसाच्या या फटक्यामुळे परिसरातील इतर शेतकऱ्यांनाही मोठा फटका बसण्याची शक्यता व्यक्त होत असून शासनाने तातडीने सर्वेक्षण करून मदत जाहीर करावी, अशी मागणी स्थानिक पातळीवरून होत आहे. यावेळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी उपसभापती संजय पवार, माजी सरपंच अनिल पाटील, कृषी सहाय्यक जाधव, युवा नेते राहुल जाधव, राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब चोबे, भाजप नेते अभिजीत चोबे आदींसह शेतकरी शहाजी मिसाळ उपस्थित होते.

# तुळजापुरात भटक्या कुत्र्यांचा उच्छाद; १४ नागरिकांना कुत्र्यांनी घेतला चावा

## भाविकांसह नागरिकांची सुरक्षा धोक्यात; नगर पालिकेकडून नसबंदी मोहिमेचा पत्ता नाही

सूरज बागल। आरंभ मराठी

**तुळजापूर - महाराष्ट्राची कुलस्वामिनी आई तुळजाभवानीच्या पवित्र नगरीत तुळजापूर येथे भटक्या कुत्र्यांचा प्रश्न दिवसेंदिवस अधिकच गंभीर बनत चालला असून नगरपरिषद प्रशासनाच्या उदासीनतेमुळे नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण झाला आहे. गेल्या काही वर्षांपासून हा प्रश्न डोकेदुखी ठरत असताना, अलीकडील काही महिन्यांत कुत्र्यांच्या हल्ल्यांच्या घटनांमध्ये लक्षणीय वाढ झाली आहे. विशेषतः लहान मुले, वृद्ध नागरिक आणि बाहेरून येणारे भाविक हे या समस्येचे सर्वाधिक बळी ठरत असल्याचे चित्र आहे.**

दोन दिवसांपूर्वी घडलेल्या धक्कादायक घटनेत एका भटक्या कुत्र्याने तब्बल १४ जणांना चावा घेतला, ज्यामध्ये सहा लहान मुलांचा समावेश होता. ही सर्व मुले आठ ते दहा वर्षे वयोगटातील असल्याने पालकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. सकाळी शाळा किंवा क्लाससाठी जाणाऱ्या मुलांना कुत्र्यांकडून लक्ष्य केले जात असल्याने अनेक मुले भयभीत अवस्थेत दिसून येत आहेत. तुळजापूर हे राज्यातील एक प्रमुख तीर्थक्षेत्र असल्याने येथे दररोज हजारो भाविकांची वर्दळ असते. अनेक भाविक रात्री अपरात्री शहरात दाखल होत असतात. मात्र अशा वेळी भटक्या कुत्र्यांच्या टोळक्यांमुळे त्यांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. बस स्थानक, मुख्य रस्ते, तसेच मंदिर परिसर या ठिकाणी कुत्र्यांची मोठ्या प्रमाणात वस्ती झाली असून अनेकदा ही कुत्री आक्रमक होत नागरिकांवर हल्ला करत असल्याच्या तक्रारी वाढल्या आहेत. नगरपरिषदेकडून भटक्या कुत्र्यांवर नियंत्रण मिळवण्यासाठी नसबंदी मोहिम राबविण्याचे आश्वासन यापूर्वी देण्यात आले होते. मात्र प्रत्यक्षात एकाही कुत्र्यावर नसबंदी करण्यात आलेली नसल्याने कुत्र्यांची संख्या वाढतच चालली आहे. प्रशासनाच्या या निष्क्रियतेमुळे नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे. या संदर्भात नगरपरिषदेचे मुख्याधिकारी अजिंक्य रणदिवे यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न करण्यात आला, मात्र त्यांनी फोन न उचलल्याने त्यांची प्रतिक्रिया मिळू शकली नाही. विशेष म्हणजे, याच विषयावर १५ फेब्रुवारी रोजी वृत्त प्रकाशित झाल्यानंतर त्यांनी पंधरा दिवसांत मोकाट कुत्र्यांवर नियंत्रण आणून नसबंदी मोहीम राबविण्याचे आश्वासन दिले होते. मात्र दोन महिने उलटूनही कोणतीही ठोस कारवाई न झाल्याने प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.



### लोकप्रतिनिधींनीच घेतला पुढाकार

कुत्र्यांच्या वाढत्या संख्येवर नियंत्रण ठेवण्यासाठी प्रशासनाकडून कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याने स्थानिक लोकप्रतिनिधींनी स्वतः पुढाकार घेत उपाययोजना सुरू केल्या आहेत. काँग्रेस नगरसेवक रणजीत इंगळे व नगरसेविका प्रगती कदम यांनी स्वखर्चातून अक्कलकोट येथील टीमला बोलावून सुमारे २० ते २५ कुत्र्यांना जेरबंद केले. यापूर्वीही नगरसेवक आनंद जगताप यांनी अशाच पद्धतीने काही कुत्र्यांना पकडून सोडण्याची व्यवस्था केली होती. मात्र या उपाययोजना तात्पुरत्या स्वरूपाच्या असल्याने प्रश्न कायम आहे.



### नगरपालिकेने पुढाकार घ्यावा

माझ्या प्रभागात दोन दिवसांपूर्वी १४ लोकांना कुत्र्याने चावा घेतला. त्यानंतर आम्ही तातडीने कारवाई करून काही कुत्र्यांना पकडले. तरीदेखील शहरात धोका कायम आहे. नगरपरिषदेकडून तात्काळ व्यापक स्तरावर उपाययोजना होणे गरजेचे आहे.

**प्रगती कदम**
नगरसेविका.

### प्रशासनाने तातडीने उपाययोजना कराव्यात

शहरातील वाढती कुत्र्यांची संख्या लक्षात घेता केवळ पकड मोहीम पुरेशी नसून शास्त्रीय पद्धतीने नसबंदी (ABC कार्यक्रम) आणि लसीकरण मोहीम राबविणे अत्यावश्यक आहे. तसेच कचरा व्यवस्थापन सुधारून कुत्र्यांना अन्नस्त्रोत कमी करणे, नागरिकांमध्ये जनजागृती करणे आणि आपत्कालीन वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. तुळजापूरसारख्या महत्त्वाच्या तीर्थक्षेत्रात ही समस्या तातडीने सोडवली नाही, तर भविष्यात आणखी गंभीर घटना घडण्याची भीती नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.

# भाटशिरपुरा येथे मोफत नेत्र तपासणी शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद



आरंभ मराठी । कळंब

कळंब तालुक्यातील भाटशिरपूरा (शिवपूर) येथे कै. जिजाबाई लिंबराज गायकवाड यांच्या प्रथम पुण्यस्मरण दिनानिमित्त आयोजित भव्य नेत्रतपासणी शिबिर उत्साहात व मोठ्या प्रतिसादात संपन्न झाले. शंकर शेठ साबळे नेत्रालय, सोलापूर आणि साई आय केअर ऑप्टिकल यांच्या संयुक्त विद्यमाने या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. छत्रपती शिवाजी महाराज स्मारक परिसरात सकाळी ८ ते १२ या वेळेत पार पडलेल्या या शिबिरात नागरिकांची मोठी गर्दी झाली. संगणकाच्या सहाय्याने नागरिकांची मोफत डोळे तपासणी करण्यात आली. तसेच अनेक रुग्णांना अल्पदरात नंबरचे चष्मे उपलब्ध करून देण्यात आले. विशेष म्हणजे, मोतीबिंदू असलेल्या रुग्णांची तपासणी करून पात्र रुग्णांची मोफत शस्त्रक्रियेसाठी नोंदणी करण्यात आली. त्यामुळे ग्रामीण भागातील गरजू नागरिकांना मोठा दिलासा मिळाला. या शिबिरासाठी वैद्यकीय तज्ज्ञ, कर्मचारी, स्वयंसेवक आणि ग्रामस्थांनी मोलाचे सहकार्य केले. शिबिराच्या यशस्वी आयोजनाबद्दल आयोजकांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# येणेगुरमध्ये ५ केव्ही ट्रान्सफॉर्मर काढण्यास शेतकऱ्यांचा विरोध महावितरणला निवेदन



आरंभ मराठी । दाळींब

उमरगा तालुक्यातील येणेगुर येथील सबस्टेशनमार्फत दाळींब, कोराळ, सालेगाव, काटेवाडी आदी गावांसह शेतीपंपांना वीजपुरवठा केला जातो. मात्र, सध्या महावितरण कंपनीकडून येथील ५ केव्ही ट्रान्सफॉर्मर काढण्याची शक्यता व्यक्त होत असल्याने परिसरातील शेतकरी संतप्त झाले असून तो ट्रान्सफॉर्मर न काढण्याची मागणी करत निवेदन सादर करण्यात आले आहे. गेल्या रब्बी हंगामात वीजपुरवठा सुरळीत व्हावा यासाठी शेतकरी प्रतिनिधी नेताजी कवठे यांच्या नेतृत्वाखाली अनेक वेळा आंदोलन करण्यात आले होते. त्या आंदोलनाला परिसरातील शेतकऱ्यांचा मोठा प्रतिसाद मिळाला होता. यानंतर महावितरणकडून मागण्या मान्य करत संबंधित ठिकाणी १० केव्ही ट्रान्सफॉर्मर बसवण्यात आला होता. मात्र, काही महिन्यांनंतर पुन्हा ५ केव्ही ट्रान्सफॉर्मर काढण्याची हालचाल सुरू असल्याची माहिती मिळताच येणेगुर, महालिंगरायवाडी, सुपतगाव, करवंजी, नळवाडी, कोराळ, सालेगाव, सुंदरवाडी आदी गावांतील शेतकऱ्यांनी एकत्र येत विरोध दर्शविला. शेतकऱ्यांनी दिलेल्या निवेदनात ५ केव्ही ट्रान्सफॉर्मर पूर्ववत कार्यान्वित ठेवण्यात यावा तसेच शेतीपंपांसाठी कमी-जास्त होणाऱ्या व्होल्टेजच्या समस्येवर तोडगा काढून वीजपुरवठा सुरळीत करावा, अशी मागणी करण्यात आली आहे. हे निवेदन महावितरणचे अभियंता पंकज घंटे यांना देण्यात आले. यावेळी दिलीप भालेराव, नेताजी कवठे, अमर वाले, संदीप बिराजदार, रतन लामजने, सुरेश लामजने, शिवराम सुरवसे यांच्यासह अनेक शेतकरी उपस्थित होते.

# येडशीत 'जागतिक मलेरिया दिना'निमित्त जनजागृती रॅली




आरंभ मराठी । येडशी

'जागतिक मलेरिया दिना'निमित्त प्राथमिक आरोग्य केंद्र येडशीच्या वतीने गावात जनजागृती रॅली काढण्यात आली. या रॅलीत ग्रामस्थ, विद्यार्थी व आरोग्य कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले. बदलत्या हवामानामुळे वाढणाऱ्या डासजन्य आजारांच्या पार्श्वभूमीवर मलेरिया, डेंग्यू व चिकनगुनिया प्रतिबंधासाठी जनजागृती करण्यात आली. तालुका आरोग्य अधिकारी डॉ. प्रमोद गिरी यांच्या हस्ते रॅलीचे उद्घाटन झाले. "उपचारांपेक्षा प्रतिबंध महत्त्वाचा असून 'हिवतापमुक्त गाव' ही संकल्पना नागरिकांच्या सहभागातूनच शक्य आहे," असे त्यांनी सांगितले. "डास पळवा - देश वाचवा", "स्वच्छता ठेवा - आजार टाळा" अशा घोषणांनी परिसर दुमदुमला. वैद्यकीय अधिकारी डॉ. दर्शना शिंदे यांनी नागरिकांना डासांची पैदास रोखण्यासाठी पाणी साचू न देणे, परिसर स्वच्छ ठेवणे, मच्छरदाणीचा वापर करणे यांसारख्या उपाययोजना करण्याचे आवाहन केले. या मोहिमेत आरोग्य कर्मचाऱ्यांनी घरोघरी भेटी देऊन जनजागृती केली. या उपक्रमामुळे ग्रामस्थांमध्ये डासजन्य आजारांविषयी जागरूकता वाढली असून 'डासमुक्त व आजारमुक्त गाव' संकल्पना साकारण्याचा विश्वास व्यक्त करण्यात आला.

# कळंब उपजिल्हा रुग्णालयात जागतिक हिवताप दिन साजरा




आरंभ मराठी । कळंब

कळंब येथील उपजिल्हा रुग्णालयात शनिवारी (दि.२५) हिवताप या आजाराबाबत जनजागृती करण्यासाठी जागतिक हिवताप दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे आयोजन रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. नागनाथ धर्माधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात हिवतापाचे जनक सर रोनाल्ड रॉस यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यानंतर उपस्थित मान्यवर व रुग्णालयातील कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी वैद्यकीय अधिकारी डॉ. राऊत यांनी हिवताप या आजाराबाबत सविस्तर मार्गदर्शन करत त्याची कारणे, लक्षणे व प्रतिबंधात्मक उपाय यांची माहिती दिली. तसेच आरोग्य सेवक मुंजाजी शिकारे यांनी हिवतापाचे स्वरूप, प्रसार, निदान, उपचार व उपाययोजना याबाबत सखोल माहिती देऊन उपस्थितांमध्ये जनजागृती केली. या कार्यक्रमास वैद्यकीय अधिकारी, सहाय्यक अधिसेविका, परिसेविका, अधिपरिचारिका, आरोग्य सेवक, आरोग्य सेविका तसेच रुग्णालयातील इतर अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कुठलाही ताप हा हिवताप असू शकतो. त्यामुळे ताप आल्यास तातडीने सरकारी दवाखान्यात जाऊन रक्ताची मोफत तपासणी करून घ्यावी. हिवताप निदान झाल्यास पूर्ण उपचार घेणे अत्यावश्यक आहे. तसेच आरोग्य विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या सर्वेक्षण मोहिमेस नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहन रुग्णालय प्रशासनाकडून करण्यात आले.

दैनिक आरंभ मराठी

## शेळगाव-वाणेवाडी शिव पाणंद रस्ता मोजणीला अखेर सुरुवात; ८ वर्षांचा 'वनवास' संपणार

# 'आरंभ मराठी'च्या बातमीने दोन जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या रस्त्याचा प्रश्न निकाली

आरंभ मराठी । तामलवाडी

सोलापूर आणि धाराशिव जिल्ह्यांच्या सीमेवरील शेळगाव (आर) आणि वाणेवाडी या दोन्ही गावांसाठी 'जीवनवाहिनी' ठरणाऱ्या रस्त्याचा प्रश्न अखेर मार्गी लागला आहे. गेल्या ८ वर्षांपासून प्रलंबित असलेल्या या कामासाठी शेतकऱ्यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश आले असून, महसूल व भूमी अभिलेख विभागाच्या वतीने प्रत्यक्ष मोजणी आणि स्थळ पाहणीला सुरुवात झाली आहे. यामुळे पावसाळ्यात संपर्क तुटणाऱ्या दोन्ही गावांतील ग्रामस्थांना मोठा दिलासा मिळाला आहे. आरंभ मराठीने या रस्त्यासंदर्भात बातमी प्रसिद्ध करताच प्रशासनाने हा प्रश्न मार्गी लावला आहे. या महत्त्वपूर्ण प्रक्रियेसाठी भूमी अभिलेख बार्शीचे प्रमोद जाधव व बिरोबा कांबळे, तसेच तुळजापूर भूमी अभिलेख कार्यालयाचे अमृतराव पी. ए. आणि लोंढे हे अधिकारी उपस्थित होते. त्यांच्या देखरेखीखाली शेळगाव आणि वाणेवाडी शिवारातील गटांची सविस्तर तांत्रिक मोजणी करण्यात आली. यावेळी सामाजिक कार्यकर्ते दयानंद बादगुडे यांनी उपस्थित अधिकाऱ्यांचे स्वागत केले. ॲड. सुरेश गायकवाड यांनी दोन्ही गावांतील शेतकऱ्यांना मार्गदर्शन करत, या शासकीय प्रक्रियेत पूर्ण सहकार्य करण्याचे आवाहन केले.



### २०१८ पासूनचा संघर्ष आणि ग्रामस्थांचा आनंद

शेळगाव व वाणेवाडी शिव हद्द, बसवेश्वर चौक येथील चारही दिशांना जाणाऱ्या रस्त्यांपैकी पांनंद रस्ता' येथून २४ एप्रिल २६ रोजी मोजणीला प्रारंभ झाला. २०१७-१८ पासून या रस्त्यासाठी शेतकरी प्रशासनाकडे पाठपुरावा करत होते. पावसाळ्यात या रस्त्यावर पाणी साचल्यामुळे दोन्ही गावांचा संपर्क पूर्णपणे तुटत असे. शालेय विद्यार्थी आणि शेतकऱ्यांना ३-४ महिने प्रचंड हाल सोसावे लागत होते. आता मोजणी पूर्ण होऊन कामाला प्रत्यक्ष गती मिळाल्याने ग्रामस्थांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.

### शेतकरी आणि ग्रामस्थांची मोठी उपस्थिती

या ऐतिहासिक प्रसंगी सोलापूर आणि धाराशिव या दोन्ही जिल्ह्यांतील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यामध्ये शेळगाव (आर) चे सरपंच प्रकाश बादगुडे, माजी पंचायत समिती सदस्य सचिन बादगुडे, स्वराज्य क्षीरसागर, प्रकाश गोडगे, भीमराव शिरसाट, राजेंद्र देवकर, मिठू देवकर, बळीराम बादगुडे, जनार्दन बादगुडे, मनोज बादगुडे, दाजी अडसूळ, पिंटू बादगुडे, संतोष सोनार; तसेच वानेवाडी येथील उत्तम अडसूळ, प्रवीण पाटील, रघु वाडकर, चंदू अडसूळ, जितेंद्र मिरजे, योगेश काटकर, शिवाजी साळुंखे, दशरथ बादगुडे व इतर मान्यवरांचा समावेश होता.

### दयानंद बादगुडे यांच्या पाठपुराव्याला यश

गेल्या आठ वर्षांपासून सामाजिक कार्यकर्ते दयानंद बादगुडे या प्रश्नावर अहोरात्र कष्ट घेत होते. संबंधित विभागांकडे निवेदने देणे, अधिकाऱ्यांच्या भेटी घेणे आणि तांत्रिक अडचणी दूर करण्यासाठी त्यांनी विशेष पुढाकार घेतला. त्यांच्या याच सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे हा रस्ता आता अस्तित्वात येत आहे.

# वाशीमध्ये नवनिर्वाचित सदस्यांचा शिक्षक संघाकडून भव्य सत्कार



आरंभ मराठी । वाशी

वाशी तालुक्यातील महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघाच्या वतीने जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या नवनिर्वाचित सदस्यांचा भव्य सत्कार समारंभ उत्साहात पार पडला. कर्मवीर भाऊराव पाटील शिक्षक सहकारी पतसंस्थेच्या सभागृहात आयोजित कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान तालुका अध्यक्ष संतोषराव मोळवणे यांनी भूषविले. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. यावेळी केशवजी सावंत, निश्चित (तात्या) चेडे, सत्यवान गपाट, अलकाताई भालेकर, सुधाकर कोल्हे, विठ्ठलराव माने यांची प्रमुख उपस्थिती होती. समारंभात जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या पदाधिकाऱ्यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला. मान्यवरांनी आपल्या मनोगतातून शिक्षण क्षेत्रातील प्रगतीसाठी शिक्षक संघाचे योगदान महत्त्वाचे असल्याचे सांगत, भविष्यातही शिक्षक व स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये समन्वय राहावा, अशी अपेक्षा व्यक्त केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सिद्धेश्वर भालेकर यांनी केले. सूत्रसंचालन बालाजी ढाणे यांनी केले असून आभार प्रदर्शन सुहास नन्नवरे यांनी मानले. कार्यक्रमास शिक्षक व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## 2020 च्या पीक विमा प्रकरणात पुढील सुनावणी 6 मे रोजी

आरंभ मराठी | धाराशिव

खरीप 2020 हंगामातील अतिवृष्टीमुळे झालेल्या पिक नुकसानीबाबत दाखल करण्यात आलेल्या पीक विमा प्रकरणात पुन्हा एकदा 'तारीख पे तारीख'ची स्थिती निर्माण झाली आहे. 24 एप्रिल 2026 रोजी झालेल्या सुनावणीतही कोणताही ठोस निर्णय न होता न्यायालयाने पुढील सुनावणीची तारीख 6 मे 2026 अशी

## मालकी हक्काच्या जागेतील दुकानावर अतिक्रमण कारवाई केल्यामुळे तुळजापूर नगरपरिषदेविरोधात तक्रार



कान
गीर
धित
र

## प्रतिबंधित गुटखा साठा व दोन पिकअपसह 13.70 लाखांचा मुद्देमाल जप्वा; शी पोलिसांची कारवाई

आरंभ मराठी / वाशी

वाशी पोलीस ठाण्याच्या पथकाने शुक्रवारी (दि.23) दुपारी सु. रुई शिवारातील कॅनल परिसरात मोठी कारवाई करत महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेला गुटखा व तत्सम तंबाखूजन्य पदार्थांचा साठा जप्त केला. या कारवाईत महिंद्रा बोलेरो पिकअप (क्र. एमएच 23 ए.यु. 1191) व अशोक लिलॅण्ड पिकअप (क्र. एमएच 23 ए.यु. 3439) या दोन वाहनांमधून "प्रिमियम शॉट लक्झरी टोबॅको" या नावाचे लाल व हिरव्या रंगाचे एकूण 7,404 गुटखा पाउच आढळून आले. या गुटखा साठ्याची किंमत 4,70,880 रुपये असून, दोन्ही वाहनांसह एकूण मुद्देमालाची किंमत 13,70,880 रुपये इतकी आहे. सदर माल विक्रीसाठी बेकायदेशीररीत्या वाहतूक व साठवणूक केली जात असल्याची माहिती पोलिसांना मिळाल्यानंतर ही कारवाई करण्यात आली. पोलिसांनी तत्काळ गुटखा व वाहने जप्त करून संबंधित व्यक्तींविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

आरंभ मराठी